# नाशिक

मराठा
नाशिक :
मेळावा रविवा
मराठवाडा, न
उपस्थित राहण




इंद्रप्रस्थ हॉल : ट्रॅव्हल्स एजंट असोसिएशन (तान)तर्फे शुक्रवारी भरविण्यात आलेल्या प्रदर्शनात पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना मिलिंद लोहकरे. शेजारी अध्यक्ष दत्ता भालेराव, आमदार देवयानी फरांदे, बाळासाहेब सानप, लक्ष्मण सावजी, ब्रिजमोहन चौधरी आदी.

# इगतपुरीत वेलनेस सेंटर, आगरटाकळीचा विकास

## पर्यटनमंत्री रावल : 'तान'तर्फे 'टुरिझम एक्स्पो' प्रदर्शनाचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ६ : लोणावळ्याला पर्याय म्हणून इगतपुरीत वेलनेस सेंटर सुरू करण्याचा पर्यटन विभागाचा विचार आहे. आगरटाकळीच्या विकासासाठीही निधी दिला जाईल. आचारसंहिता संपल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविली जाईल. सारंगखेडाचे ब्रॅन्डिंग राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर केले आहे. वाइन टुरिझमलाही चालना देत आहोत, अशी घोषणा पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी आज केली.

गंगापूर रोडवरील इंद्रप्रस्थ सभागृहात ट्रॅव्हल एजंट असोसिएशन ऑफ नाशिक (तान)तर्फे आयोजित टुरिझम एक्स्पो २०१७ च्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी आमदार बाळासाहेब सानप, प्रा. देवयानी फरांदे, लक्ष्मण सावजी, चौधरी यात्रा कंपनीचे संचालक ब्रिजमोहन चौधरी, 'तान'चे अध्यक्ष दत्ता भालेराव, उपाध्यक्ष राजेंद्र बकरे आदी उपस्थित होते. दूर्वांकुर ट्रॅव्हल्सचे मिलिंद लोहकरे यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**आगरटाकळीच्या कामांना मंजुरी**

श्री. रावल म्हणाले, की आगरटाकळी पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी पहिल्या टप्प्यातील कामांना मंजुरी मिळालेली आहे. आचारसंहिता संपल्यानंतर निविदाप्रक्रिया राबविली जाईल. २०१७ हे पर्यटन वर्ष जाहीर केले असून, या वर्षातील पहिलाच कार्यक्रम नाशिकमध्ये होत असल्याचा आनंद होत आहे. नाशिकचा विचार केल्यास लोणावळ्याला पर्याय म्हणून इगतपुरी येथे वेलनेस सेंटर सुरू करण्याचा मानस आहे. तसेच, पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी नाशिक महोत्सव घेण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. नाशिक शहर, जिल्हा व विभाग स्तरावर योग्य नियोजन करून नाशिकचे ब्रॅन्डिंग करण्याची गरज आहे. काही कामांना विरोध केला जातो; परंतु कमीत कमी विरोध होईल, अशा पद्धतीने सामंजस्याने कामे करण्याकडे भर असेल, असे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविकात सागर वाघचौरे यांनी वाटचाल विशद केली. अध्यक्ष भालेराव यांनी मनोगतातून संघटनेच्या मागण्या श्री. रावल यांच्यासमोर ठेवल्या. दरम्यान, इंद्रप्रस्थ सभागृहात आयोजित या प्रदर्शनाला रविवार (ता. ८)पर्यंत नाशिककरांना भेट देता येणार आहे. या प्रदर्शनात पर्यटनासाठीचे विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## जागतिक वारसा दर्जासाठी नाशिक-त्र्यंबकचे सर्वेक्षण

**नाशिक :** त्र्यंबकेश्वर-नाशिक या सिंहस्थ शहरांचे सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन या शहरांना जागतिक वारसा असलेली शहरे म्हणून जाहीर करता येईल का, याची केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून पाहणी सुरू झाली आहे. पुरातत्त्व विभागाच्या जागतिक वारसा विभागाचे निर्देशक के. लुर्दसामी यांनी पुरातत्त्व विभागाच्या सर्वेक्षण अधीक्षकांना सर्वेक्षणाचे आदेश दिले आहेत. त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्त ललिता शिंदे यांनी मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत केंद्रीय पुरातत्त्व विभागाने हा आदेश दिला. पुरातन सर्वेक्षण विभागाच्या औरंगाबाद येथील अधीक्षकांना तशा आशयाचे पत्र केंद्रीय पुरातत्त्व विभागाने दिले आहे. त्र्यंबकेश्वर व नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्याची जागतिक वारसा म्हणून नोंद झाली आहे. शहराचे अध्यात्मिक महत्त्व, सांस्कृतिक, समृद्धी, पुरातन पाऊलखुणा अशा सर्वस्पर्शी अंगाने सर्वेक्षण केले जाणार आहे.